जा.क्र./वाहन विभाग/४४७ /२०२६.
इचलकरंजी महानगरपालिका कार्यालय.
दि.१०/०९/२०२६

# जाहीर प्रकटन
# दरपत्रक/ कोटेशन

गणेशोत्सव काळांत विसर्जित केलेल्या गणेश मूर्तींची तसेच निर्माल्याची वाहतूक करण्यासाठी ट्रॅक्टर, ट्रॉली व १२ टनी टिप्पर या प्रकारातील तत्सम वाहने भाडेतत्वावर पुरविणेकामी मक्तेदार किंवा व्यावसायिक यांचेकडून खालील काम करणेकामी अल्पमुदतीचे दरपत्रक/ कोटेशन मागविणेत येत आहेत. मक्तेदारांनी आपले दरपत्रक/ कोटेशन इकडील वाहन विभागाकडे दि.    /०९/२०२६ इ. रोजी दु.०३.०० वाजेपर्यंत सादर करणेची आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | दरपत्रक अर्जाची किंमत रुपये | बयाणा रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | गणेशोत्सव ,काळांत विसर्जित केलेल्या गणेश मूर्तींची तसेच निर्माल्याची वाहतूक करण्यासाठी ट्रॅक्टर, ट्रॉली व १२ टनी टिप्पर या प्रकारातील तत्सम वाहने भाडेतत्वावर पुरविणे. | र.रु.८,७६,१५०/- | रु.१,७००/- (जी.एस.टी. सह) | रु.८,७६१/- | १५ दिवस |

**आवश्यक कागदपत्रे**

१) शासन संस्थेकडील रजिस्ट्रेशन किंवा शॉप अॅक्ट लायसन्स किंवा उद्योग आधार सत्यप्रत.
२) मक्तेदार पॅनकार्ड सत्यप्रत.
३) जी.एस.टी. रजिस्ट्रेशन व सोबत जी.एस.टी. चालू असलेचे सत्यप्रत
४) मक्तेदाराच्या वतीने कोणास प्राधिकृत केलेले असलेस त्याबाबत कुल मुखत्यारपत्र.

**अटी व शर्ती:**

१. वरील बाबींची सविस्तर माहीती इकडील वाहन विभागाकडे उपलब्ध आहे.
२. दराची इकडून निक्षून खात्री केले नंतरच दर मान्य करणेचा अधिकार महापालिकेकडे राखुन ठेवणेत आले आहे.
३. मक्तेदाराने दरपत्रकमधील दर सर्व शासकीय करांसह देणेचे आहेत.
४. सदर कामी मंजूर अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ४% सुरक्षा ठेव रक्कम वरील कामाचे देयकातून दयावी. तसेच बयाणा व सुरक्षा ठेव रक्कम ही वरील काम पुर्ण झाले नंतर सहा महिन्यांनी कामाची प्रत योग्यरीत्या असल्याची खात्री झाल्यानंतर परत मिळेल. बयाना व सुरक्षा डिपॉझीट रक्कमेवर व्याज मिळणार नाही.
५. महापालिकेस पुरवठा करण्यात येणाऱ्या वाहनांची प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडील अद्ययावत कागदपत्रे, (आर.सी. व टी.सी., हवा प्रदूषण प्रमाणपत्र. विमा पॉलिसी, वाहनचालकाचे लायसन्स इ. ची साक्षांकित छायांकित प्रत महापालिकेच्या वाहन विभागाकडे देणे.

६. वाहनाचा अपघात झाल्यास त्याची सर्व जबाबदारी ठेकेदाराची / वाहन मालकाची राहील. तसेच नैसर्गिक आपत्ती, दंगल, दगडफेक, जाळपोळ, यामुळे वाहनाचे कोणतेही नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील. त्याबाबत कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई महानगरपालिकेमार्फत मिळणार नाही.

७. वाहना नादुरुस्त झाल्यास ते त्वरित दुरुस्त करून घेण्यात यावे. तसेच कार्यालयाची गैरसोय होऊ नये म्हणून त्या कालावधी करिता तात्पुरत्या स्वरूपात पर्यायी वाहन तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावे. दिलेले पर्यायी वाहन योग्य नसल्यास ते नाकारण्याचा अधिकार महानगरपालिकेचा राहील. अशी पर्यायी वाहने योग्य त्या आर.टी.ओ. व विमा कागदपत्रासह असावेत सदरच्या सर्व अटी व शर्ती त्यास लागू राहतील.

८. पुरविण्यात येणाऱ्या वाहन चालकाची वर्तणूक ही चांगली असली पाहिजे. कोणत्याही वाहनचालका विरुद्ध महानगरपालिकेच्या कर्मचारी /अधिकारी यांची तक्रार आल्यास दोन दिवसात त्या वाहन चालका ऐवजी नवीन वाहन चालक पुरवण्याची जबाबदारी निविदा धारकाची असेल.

९. पुरवठादाराने करारनामा लिहून दिल्यावर महानगरपालिकेच्या लेखी आदेशानुसार ठरवून दिलेल्या अथवा मागणी केलेल्या वाहनांचा तात्काळ पुरवठा केला पाहिजे.

१०. महानगरपालिकेने लेखी आदेश दिल्याप्रमाणे पुरवठादाराने विहित मुदतीत आवश्यक वाहनांचा पुरवठा वेळेत करणेचा आहे तसे न केल्यास महानगरपालिका इतर कोणत्याही पुरवठा दाराकडून सदरचे वाहन बाजारभावाने भाड्याने घेतले जाईल व त्या वाहनाचे देयक ठेकेदाराकडून वसूल केले जाईल.

११. उपरोक्त अटी व शर्तीचा भंग झाल्यास रक्कम रु.१,०००/- प्रतिदिन मा.आयुक्तसो यांचे आदेशाप्रमाणे दंड आकारण्यात येईल.

उपायुक्त
इचलकरंजी महानगरपालिका

**प्रत**

**१) कार्यालयीन जमादार/-**

उपरोक्त दरपत्रक/ कोटेशन इ.म.न.पा. नोटीस बोर्डवर प्रसिध्दी करणेत यावे.

**२) संगणक विभाग,**

उपरोक्त दरपत्रक/ कोटेशन इ.म.न.पा.च्या संकेतस्थळावर प्रसिध्दी करणेत यावे.